लोकमत

# कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम काळाची गरज : कुलगुरू डॉ. शिर्के

## उदरनिर्वाहाचे साधननिर्मितीसाठी प्रभावी अंमलबजावणी हवी

कोल्हापूर, ता. २९ : "नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारताना अभ्यासक्रमातून निरंतर कौशल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. या शिक्षणातून विद्यार्थ्यांनी उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी दर्जेदार कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम काळाची गरज आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी केल्यास त्याचा उपयोग निश्चितपणे होईल," असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, इचलकरंजीच्या व्यंकटेश महाविद्यालयातर्फे एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार झाले. डॉ. नंदकुमार मेकोथ, विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, हरिष बोहरा, प्राचार्य व्ही. ए. माने उपस्थित होते. वेबिनारला ३४६ शिक्षक, संशोधक, ज्येष्ठ



नागरिक उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "आजच्या आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षण क्षेत्रावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची जबाबदारी वाढली आहे. प्रत्येक विद्यार्थी हा गुणवत्तापूर्ण, उदरनिर्वाहक्षम बनविणे ही जबाबदारी आहे. प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळत नाही. अशावेळी शाळा-महाविद्यालयांनी विद्यार्थी रोजगारक्षम बनविण्यासाठी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण द्यावे."

गोवा व्यवस्थापन संस्थेचे प्रा. डॉ. नंदकुमार मेकोथ म्हणाले, "कौशल्य विकासाकडे विद्यार्थ्यांनी सूक्ष्मपणे पाहून जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात करावी. या कौशल्याच्या आधारे उदरनिर्वाहाचे साधन स्वत: निर्माण करता आले पाहिजे. आज नोकरी मिळवण्यासाठी स्पर्धा असून त्यात टिकून राहण्यासाठी उमेदवाराकडे कौशल्ये पाहिजे."

डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. अनिल राव यांनी विचार मांडले. डॉ. गुरव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य व्ही. ए. माने यांनी स्वागत केले. शुभांगी जरंडीकर, डॉ. सुमन बुवा, महेश चव्हाण, यशोधन बोकील, अतुल ऐतवडेकर आदी उपस्थित होते. ऑनलाईन कार्यक्रमात नवीन उद्योजकांना ऑनलाईन मार्केटिंग हा उपक्रम आयोजित केला.

3 0 AUG 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘भुईभिंगरी’मधून शिक्षणातील अनुत्तरित प्रश्नांना स्पर्श

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : वसंत खोत यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ‘भुईभिंगरी’ हे प्रा. वसंत खोत यांचे स्वकथन शिक्षण क्षेत्रातील अनेक अनुत्तरित प्रश्नांना स्पर्श करणारे आहे. त्या अनुषंगाने समाजात सर्वंकष चिंतन होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे येथील शिक्षक, लेखक प्रा. वसंत खोत यांच्या ‘भुईभिंगरी’ या स्वकथनात्मक पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. कुलगुरू कार्यालयातील या कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर उपस्थित होते. तत्कालीन काळात शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेपुढे जे प्रश्न उभे ठाकले होते, त्यांनी आज अधिक गंभीर रूप धारण केले आहे. त्यांच्यावर उपाययोजना करण्यासाठी आजच्या पिढीने तत्परतेने सज्ज होणे आवश्यक असल्याचे मत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केले.



कोल्हापुरात शनिवारी भुईभिंगरी'या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून संजय शेलार, नंदकुमार मोरे, दशरथ पारेकर, वसंत खोत, रणधीर शिंदे, यु.के. सकट उपस्थित होते.

### कालखंडाचे कथन

अस्थिर भणंगपण, अपमान आणि मानहानीच्या जीवन कालखंडाचे कथन 'भुईभिंगरी'असल्याचे लेखक प्रा. खोत यांनी सांगितले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण भागातील साठ-सत्तरच्या दशकातील पिढीचे प्रातिनिधिक कथन म्हणून ‘भुईभिंगरी’कडे पाहण्याची गरज असल्याचे ज्येष्ठ पत्रकार पारेकर यांनी सांगितले.

सामान्य व्यक्तीच्या स्वकथनामध्ये इतिहासाच्या पाऊलखुणांचा महत्त्वाचा दस्तावेज म्हणून सामोरे येण्याची क्षमता असते. त्या दृष्टीने प्रा. खोत यांच्या या लेखनाचे स्वागत करणे आवश्यक असल्याचे मराठी विभागातील डॉ. नंदकुमार मोरे यांनी सांगितले.

मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी चित्रकार संजय शेलार, डॉ. व्ही. एन. शिंदे, यु. के. सकट आदी उपस्थित होते.

30 AUG 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या ५० हजार विद्यार्थ्यांनी एकाच वेळी दिली ऑनलाईन परीक्षा

## पहिल्याच प्रयत्नात मोठे यश : व्हॉइस मेसेज; हेल्पलाईन सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने रविवारी एका आव्हानात्मक ऑनलाईन परीक्षेचा टप्पा यशस्वी केला. पर्यावरण अभ्यास सर्व पदवी स्तरावर भाग २, सत्र चार मधील परीक्षेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा अशा तीन जिल्ह्यातील २७३ महाविद्यालयातील ५० हजार ५५७ विद्यार्थ्यांनी एकाच वेळी ऑनलाईन परीक्षा दिली.

यापूर्वी ऑनलाईन परीक्षा झाल्या असल्या तरी इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी एकाच वेळी दुपारी साडेबारा ते दीड यावेळेत विनाअडथळा परीक्षा देण्याची विद्यापीठाच्या इतिहासातील पहिलीच वेळ होती. हा प्रयोग विद्यापीठ परीक्षा विभागाने आपल्या तांत्रिक क्षमतेच्या जोरावर यशस्वी करुन दाखविला.

> परीक्षेच्या निमित्ताने विद्यापीठाने आपल्या तांत्रिक क्षमता वाढविल्या होत्या. परीक्षेच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले. विद्यापीठाच्या इतिहात प्रथमच एवढ्या मोठ्या संखेने विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. हे एक आव्हानात्मक परीक्षा होती.
>
> - गजानन पळसे, प्रभारी संचालक, परीक्षा विभाग, शिवाजी विद्यापीठ



यासाठी सर्व विद्यार्थ्यांना युजर आयडी व पासवर्ड एसएमएसद्वारा व ई - मेल द्वारा पाठविण्यात आले होते. परीक्षेसाठी आवश्यक असणारी ऑनलाईन परीक्षेची लिंक, अँड्रॉइड ॲपची लिंक, युजर मॅन्युअल, एफ ए क्यू तसेच तांत्रिक अडचण येऊ नये म्हणून संगणक व मोबाईल मधील तांत्रिक सेटिंग बाबतचा व्हिडिओ, ऑनलाईन प्रीक्षा कशी द्यावी याबाबतचा डेमो व्हिडिओ पाठविले होते.

परीक्षेसाठी परीक्षा विभागाचे व हेल्पलाइने व्यवस्थेचे चाळीस संपर्क क्रमांक पाठवण्यात आले. . सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी यासाठी प्रथमच व्हॉइस मेसेज पाठविण्यात आला होता. महाविद्यालयाचे कर्मचारी शिक्षक प्राचार्य यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी, यासाठी आवाहन केले. परीक्षा सुरु असताना जर काही अडचणी आल्याच तर त्यावर संपर्क साधून अडचणीचे निराकरण करता यावे म्हणून सकाळी नऊ वाजल्यापासून कंपनीची हेल्पलाइन ॲक्टिव्ह करण्यात आली. या हेल्पलाईनवर दोन हजार विद्यार्थ्यांनी संपर्क केला, त्यावेळी त्यांना योग्य मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील कर्मचारी विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी व तांत्रिक अडचणीवर मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. परीक्षेसाठी अर्ज भरलेली विद्यार्थी संख्या ५२ हजार २५७ होती, तर प्रत्यक्षात ५० हजार ५५७ परीक्षा दिली. परीक्षेस १७०० गैरहजर विद्यार्थी गैरहजर राहिले.

पुढारी

# विद्यापीठाच्या 'पर्यावरण अभ्यास' परीक्षेला ५० हजार विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने रविवारी (दि.२९) पदवीस्तरावरील सत्र ४ मधील 'पर्यावरण अभ्यास' या आवश्यक विषयाची परीक्षा सुरळीत पार पडली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमधील ५० हजार ५५७ विद्यार्थ्यांनी एकाच सत्रामध्ये पहिल्यांदाच ही परीक्षा दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील पदवीस्तरावरील २७३ महाविद्यालयांचा यात समावेश होता. परीक्षेसाठी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ५२ हजार २५७ होती. प्रत्यक्षात ५० हजार ५५७ विद्यार्थी परीक्षेला बसले. १७०० विद्यार्थी गैरहजर राहिले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## समक्ष मुलाखत (Walk in Interview)

शिवाजी विद्यापीठ कार्यालयात ११ महिन्याच्या हंगामी कालावधीकरिता USIC (CFC) मध्ये खालील पद रोजंदारीवर भरावयाचे आहे. तेव्हा पात्र उमेदवारांनी मा. विभागप्रमुख संयुक्त सुविधा केंद्र (सीएफसी) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे अर्ज करून दि. १७/०९/२०२१ पर्यंत **cfc@unishivaji.ac.in** या संकेत स्थळावर पाठवावेत. अर्जासह व आपल्या मूळ कागदपत्रासह व झेरॉक्सप्रतींसह खाली नमूद केलेल्या दिनांकास समक्ष मुलाखतीसाठी स्व:खर्चाने दुपारी १२-०० वाजता उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|
| १. | प्रयोगशाळा सहाय्यक | **Any Diploma from M.S.B.T.E. or B. Sc.** संगणक ज्ञान आवश्यक | रू. ४००/- प्रतीदिन |

१. **वयोमर्यादा** : खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे वयोमर्यादा राहील व राखीव उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. सदर किमान व कमाल वयोमर्यादा मुलाखती दिवशी सापेक्ष समजण्यात येईल.

२. उपरोक्त पदांकरीता विद्यापीठ सेवेत हंगामी स्वरूपात कार्यरत असणाऱ्या उमेदवरांनी अर्ज करु नये, तसे मुलाखतीस हजर राहू नये.

३. सदर पदासाठीचे अर्ज दि. १७-९-२०२१ रोजी रात्री १२-०० पर्यंत cfc@unishivaji.ac.in या संकेत स्थळावर पाठविणेत यावेत. त्यानंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

४. कोव्हिड-१९ च्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून सदरील मुलाखती घेण्यात येणार आहेत.

५. ज्यांना Online मुलाखत द्यावयाची आहे. त्यांनी त्यांच्या E-mail मध्ये तसे नमुद करावे. अशा उमेदवारांना दि. २०-९-२०२१ रोजी त्यांच्या E-mail वर Online Interview ची Link पाठविणेत येईल.

**मुलाखतीचे ठिकाण : संयुक्त सुविधा केंद्र (सीएफसी), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर * सीएफसी दुरध्वनी क्र. ०२३१-२६०९१७०**

**मुलाखतीचे दिनांक : २३-०९-२०२१ रोजी दुपारी १२-०० वाजता**

शिवाजी विद्यापीठ
दिनांक : ३०/०८/२०२१

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव

30 AUG 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम काळाची गरज : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारत असताना आपल्या अभ्यासक्रमातून निरंतर कौशल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांनी उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी दर्जेदार कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम काळाची गरज आहेत. त्याची प्रभावी अंमलबजावणी केल्यास या शिक्षणाचा उपयोग निश्चितपणे विद्यार्थ्यांना होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले, यावेळी उद्घाटक ते बोलत होते.



कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षण क्षेत्रावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची जबाबदारी वाढली आहे. या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये प्रत्येक विद्यार्थी हा गुणवत्तापूर्ण, उदरनिर्वाहक्षम बनवणे ही आपली जबाबदारी आहे.

यासाठी कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमांची अधिकाधिक रचना होऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळत नाही. अशा वेळी शाळा-महाविद्यालयांनी आपला विद्यार्थी रोजगारक्षम बनवण्यासाठी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

### उद्योजकांचा सहभाग

या ऑनलाईन कार्यक्रमात नवीन उद्योजकांसाठी ऑनलाईन मार्केटिंग हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये कोल्हापुरी चप्पल, गूळ, मसाले, चांदी दागिने यांचे उद्योजक सहभागी झाले.

कौशल्य प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान त्याला भावी जीवनात उपयुक्त ठरेल.

गोवा व्यवस्थापन संस्थेचे डॉ. नंदकुमार मेकोथ म्हणाले, केवळ कौशल्य प्रशिक्षण महत्त्वाचे आहे, याबाबत चर्चा होताना आपण पाहतो; परंतु कौशल्य विकासाकडे विद्यार्थ्यांनी अत्यंत सूक्ष्मपणे पाहून आपले जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी विविध कौशल्ये परिपूर्णतेने आत्मसात करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमात डॉ. बी. एम. हिर्डेकर व डॉ. अनिल राव यांनी मार्गदर्शन केले. विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य व्ही. ए. माने यांनी स्वागत केले. यावेळी हरिश बोहरा, शुभांगी जरंडीकर, डॉ. सुमन बुवा, महेश चव्हाण, यशोधन बोकील, अतुल एतवाडेकर व आयोजन समितीचे सर्व घटक उपस्थित होते.

सकाळ

# प्रा. अलघ यांचे उद्या व्याख्यान



प्रा. अलघ

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे मंगळवारी (ता. ३१) माजी केंद्रीय मंत्री, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. वाय. के. अलघ यांचे व्याख्यान होणार आहे. झूम ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर दुपारी पावणे तीन वाजता व्याख्यान होईल.

'सिलेक्टेड इंडियन इकॉनॉमिक प्रोब्लेम्स: इज देअर थिएरी बिहाईंड देम' यावर प्रा.अलघ मार्गदर्शन करतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती विभागाचे प्रमुख प्रा. ज्ञानदेव तळुले यांनी दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. यशवंतराव थोरात उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या वेबसाईटवर लेक्चर सिरिज इन इकॉनॉमिक्स येथे व्याख्यानाची लिंक उपलब्ध करून दिली आहे.

तरूण भारत

# दिवंगत कवी देशपांडे यांची ग्रंथसंपदा विद्यापीठाकडे सुपूर्द

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिवंगत कवी ना. वा. तथा नारायण वामन देशपांडे यांच्या इच्छेनुसार त्यांची समग्र ग्रंथसंपदा त्यांच्या पत्नी सुनंदा देशपांडे यांनी आज शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राकडे सुपूर्द केली. विद्यापीठाच्या वतीने उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी ही ग्रंथसंपदा स्विकारली आहे.

कवी ना. वा. देशपांडे यांनी त्यांच्या हयातीत कविता, गीतांसोबतच अनेक नामवंत शाहीरांसाठी लेखन केले आहे. त्यांचे दोन वर्षांपूर्वी वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्याकडे महाभारत, संतसाहित्य यांसह अनेकविध प्रकारची दुर्मिळ ग्रंथसंपदा होती. त्यांच्या पत्नी सुनंदा यांनी शिवाजी विद्यापीठाच्या बॅ.

- उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी ४५६ ग्रंथांचा केला स्वीकार

बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास देणगी स्वरुपात एकूण ४५६ ग्रंथ उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांच्याकडे सुपूर्द केले आहेत. प्रा. शशिकांत चौधरी यांचे या प्रक्रियेसाठी सहकार्य लाभले. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांचे मार्गदर्शन लाभले.

कवी ना.वा. देशपांडे हे कोल्हापुरातील अनेक शाहीरांचे लाडके कवी होते. शीघ्रकवी लहरी हैदर, ज्येष्ठ कवी माडगूळकर आणि साहित्यिक शिवाजी सावंत यांच्याशी त्यांचा मोठा स्नेह होता.

तरूण भारत

# अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार

## डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वर्धापनदिनी होणार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडून २०२१-२२ यावर्षाचा डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार सुप्रसिद्ध अर्थतज्ञ व शिक्षणतज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना जाहीर झाला. विद्यापीठाचा वर्धापनदिन बुधवार १ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता साजरा होणार असून या कार्यक्रमात या पुरस्काराने प्रा. पाटील यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

प्रा. पाटील यांनी दीर्घकाळ शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्याशिवाय विद्यापीठ व सामाजिक संस्था तद्वतच शासकीय विविध मंडळांवर सदस्य म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. ते महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचे सदस्य



होते, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनीचे ते संचालक सदस्य आहेत. त्यांची इंग्रजी व मराठीमध्ये अर्थशास्त्राची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. तसेच त्यांचे अर्थशास्त्रावर प्रासंगिक भाष्य करणारे अनेक लेख राष्ट्रीय संशोधन पत्रिकेमधून विविध वृत्तपत्रातून व मासिकातून प्रसिद्ध झालेले आहेत.

डॉ. प्रा. पाटील यांच्या या निवडीबद्दल डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय पाटील व कुलगुरु डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. वर्धापनदिनाच्या निमित्ताने डॉ. डी. वाय. पाटील यांच्या नावाने आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श सेवक पुरस्कार, विज्ञानाचार्य, कार्यरत्न, उत्कृष्ट संशोधक, गुणवंत विद्यार्थी असेही पुरस्कार देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमात प्राध्यापक पाटील यांच्या अर्थाभिव्यक्ती' व 'Essays in Economics Persuasian' या पुस्तकांचेही प्रकाशन होणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी राहूल रेखावार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कुलपती डॉ. संजय डी. पाटील हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल हे विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर करणार आहेत. यावेळी डी. वाय पाटील शिक्षण संस्थेचे विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील यांचीही उपस्थिती असणार आहे.